| MHOS020007972026 | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३९८ /२०२६**<br>**हसीना व इतर विरुध्द निरंक** |
|---|---|

## <u>निशाणी क्रमांक १ वरील आदेश</u>

अर्जदार यांनी मुंबई रेग्युलेशन (विनिमय) कायद्यातील कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांच्या म्हणण्यानुसार अर्जदार क्रमांक १ ते ६ हे **मयत अब्दुल अहेमद अब्दुल गणी कुरेशी** यांचे मुले व आई आहेत. **मयत अब्दुल अहेमद अब्दुल गणी कुरेशी हे** दिनांक **२४.०१.२०२५** रोजी मयत झाले आहेत. **मयत अब्दुल अहेमद अब्दुल गणी कुरेशी** यांच्या मृत्यु पश्चात अर्जदार क्रमांक १ ते ६ हेच कायदेशीर वारस आहेत. **मयत अब्दुल अहेमद अब्दुल गणी कुरेशी** यांचे मृत्युनंतर त्यांचे वारसांना मृत्यूप्रमाणपत्राची शासकीय व निमशासकीय कारणांसाठी आवश्यकता असल्यामुळे अर्जदारांनी वारसा दाखला मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. तसेच, वारसा दाखला प्रमाणपत्र मिळण्याची विनंती केली आहे.

३. माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्रमांक १ ते ६ हे विनंती केल्याप्रमाणे वारस दाखला प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे काय ? | होय... |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ करीता :-</u>**

४. अर्जदार यांचे विधीज्ञ श्री. आर. एस. जगताप यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांनी आपल्या अर्जातील म्हणण्याच्या पृष्ट्यर्थ **अर्जदार क्रमांक १** हसीना बेगम अब्दुल अहेमद कुरेशी **नि.क्र.१०** वर पुराव्याचे शपथपत्र सादर केले असुन, त्यामध्ये अर्जदार यांनी शपथेवर अर्जातील नमुद मजकुर कथन केलेला आहे. या व्यतिरिक्त अर्जदार यांनी **मयत अब्दुल अहेमद अब्दुल गणी कुरेशी** यांच्या मृत्यु दाखल्याच्या प्रती **निशाणी क्रमांक १३** वर, अर्जदारांच्या अधारकार्डची छायांकीत प्रती दाखल केलेल्या आहेत. **दिनांक १३.०५.२०२६ रोजीच्या दैनिक संघर्ष समाजवादाचा या वृत्तपत्राची जाहीर नोटीस नि.क्र.०९** वर दाखल केलेली आहे. तसेच अर्जदाराने **नि.क्र.११** वर पुरावा बंद करण्याची पुरसीस दाखल केली आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार क्रमांक १ ते ६ यांच्या नात्याबाबत कोणताही वाद नाही. सदर प्रकरणामध्ये जाहिर नोटिसीच्या अनुषंगाने कोणीही हजर होवुन हरकत नोंदविलेली नाही. अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रांचे व पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, **मयत अब्दुल अहेमद अब्दुल गणी कुरेशी** हे दिनांक **२४.०१.२०२५** रोजी मयत झाले आहेत. तर, प्रस्तुत अर्जदार हे **मयत अब्दुल अहेमद अब्दुल गणी कुरेशी** यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत.

५. अर्जदाराने मुंबई रेग्युलेशन कायद्याच्या तरतुदीप्रमाणे सायटेशन दिनांक ११.०५.२०२६ रोजी धाराशिव येथील दिवाणी न्यायालय, व.स्तर, धाराशिव, तहसिल कार्यालय, धाराशिव येथे डकवुन बजावणी केलेली आहे, त्याबाबतचा अहवाल **नि.क्र.६** वर दाखल केला आहे. सदर अभिलेखावरील तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता, मी या निष्कर्षाप्रत आले आहे की, प्रस्तुत अर्जदार हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. वारस प्रमाणपत्र हे फक्त वारस आहे असे ठरवते. ते मयताच्या मिळकतीमध्ये हक्क, अधिकार प्रस्थापित करीत नाही. सबब, मी मुद्दा क्र.१ चे

निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र. २ करीता खालीलप्रमाणे आदेश निर्गमीत करीत आहे.

**आ दे श**

१. अर्ज **मंजुर** करण्यात येतो.

२. आवश्यक ती कोर्ट फी भरल्यानंतर मुंबई रेग्युलेशन (विनीमय) कायद्यातील तरतुदीनुसार, अर्जदार क्रमांक १ ते ६ हे **मयत अब्दुल अहेमद अब्दुल गणी कुरेशी** यांचे कायदेशीर वारस आहेत असे वारस दाखला **(Appendix-B)** प्रमाणे देण्यात यावे.

३. येणेप्रमाणे देण्यात आलेले प्रमाणपत्र हे कोणत्याही सरकारी किंवा बिनसरकारी संस्थेकडुन रक्कम प्राप्ती करीता लागु ठरणार नाही.

४. अर्जदार यांनी परिच्छेद ३०६ सिव्हील मॅन्युअल प्रमाणे, सदरचे वारसा प्रमाणपत्र हे कोणत्याही चुकीच्या कामासाठी वापरले जाणार नाही असे क्षमापुर्ती बंधपत्र दाखल करावे.

५. सदरचे वारसा प्रमाणपत्र हे कोणत्याही प्रकारचा हक्क/शिर्षक अर्जदाराच्या बाजूने जाहिर करत नाही आणि सदरचे प्रमाणपत्र असे जाहिर करते की, अर्जदार तसेच परीच्छेद क्र. २ मधील अनु क्रमे.१ ते ६ हे कायद्याने मयत **अब्दुल अहेमद अब्दुल गणी कुरेशी** यांचे वारस आहेत.

६. ही बाब स्पष्ट करण्यात येते की, सदरचा अर्ज हा अर्जदार तसेच परीच्छेद क्र.२ मधील अनु क्रमे.१ ते ६ हे मयत **अब्दुल अहेमद अब्दुल गणी कुरेशी** यांचे मृत्युपत्र व्यवस्थापक अथवा प्रबंधक म्हणून जाहिर करण्यात आलेला नाही. त्यामुळे कोर्ट फी बद्दल कोणताही निर्णय देण्यात आलेला नाही. सदरच्या आदेशाचा कोणत्याही फेरफार अथवा मयताच्या मालमत्तेला नाव लावण्यासाठी वापर करण्यात येऊ नये.

**SD/-**
(दिव्या सारंग करभाजन)
४थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उस्मानाबाद

दिनांकः- ०६.०७.२०२६

## C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment/order are same, word to word, as per the original judgment/order;

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | N. P. Jadhav, Marathi Stenographer, (Lower Grade) |
| Court Name | : | 4th Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Dharashiv |
| Date of judgment/order | : | 06/07/2026 |
| Date of Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 06/07/2026 |
| Judgment/Order uploaded o | : | 06/07/2026 |